जिव्हाळा जपणारी माणसं!

# चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि.

7588 48 48 48
7588 18 18 18

Reg.No.17-08288/94-95 (R.O.JAIPUR)

**कॉर्पोरेट कार्यालय:** तिरुपती अपार्टमेंट, गायकवाड सभागृहाजवळ, नंदिनी नदी रोड, मुंबई नाका, भाभा नगर, नाशिक (महाराष्ट्र)

TOUR -email: enq@choudharyyatra.co.in BUS -email: bus@choudharyyatra.co.in www.choudharyyatraindia.com Choudhary Yatra Company Pvt. Ltd. choudharyyatracompanypvtltd.

**व्हिसा । फ्लाईट । पॅकेज । शाळा–कॉलेज व ग्रुप पॅकेज । हॉटेल । एफआयटी**

## यात्रा क्र. 31 यात्रेचा दैनिक कार्यक्रम





| दिवस | दिनांक | दक्षिणभारत, तिरुपती, कन्याकुमारी यात्रेचा दैनिक कार्यक्रम. (जाता-येता रेल्वे/विमान) |
|---|---|---|
| 01 | | संबंधीत प्रस्थान कार्यालय येथे सर्व यात्रेकरुंनी निघण्याची वेळ विचारुन यात्रेस शुभारंभ. पुणे/मुंबई/औरंगाबाद/मनमाडमार्गे रेल्वेने मदुराईसाठी रवाना. |
| 02 | | दिवसभर मदुराईसाठी रेल्वे प्रवास. |
| 03 | | सकाळी मदुराईसाठी प्रवास व मदुराई येथे मिनाक्षी मंदिर दर्शन घेऊन मदुराई येथे मुक्काम. |
| 04 | | सकाळी रामेश्वरम येथे बारा ज्योर्तिलिंगापैकी एक व चार धामपैकी एक पवित्र धाम रामेश्वरम् मंदिर दर्शन घेऊन मदुराई/कन्याकुमारी येथे पोहोचल्यानंतर मुक्काम. |
| 05 | | सकाळी सुचिंद्रम येथे पवित्र शिवइंद्रम मंदिर दर्शन घेऊन, कन्याकुमारी येथे स्वामी विवेकानंद स्मारक, महात्मा गांधी स्मारक, कन्याकुमारी देवी मंदिर दर्शन घेऊन कन्याकुमारी येथे मुक्काम. |
| 06 | | सकाळी कन्याकुमारीहून उटीसाठी रवाना व पोहोचल्यानंतर मुक्काम. |
| 07 | | सकाळी उटी येथे नैसर्गिक सृष्टीसौंदर्य, बोटॅनिकल गार्डन व बोटींग करुन उटी/म्हैसुर येथे मुक्काम. |
| 08 | | सकाळी म्हैसुर येथे सिटी पॅलेस, म्युझियम, चामुंडा मंदिर, सायंकाळी वृंदावन गार्डन पाहुन म्हैसुर येथे मुक्काम. |
| 09 | | ✻✻ सकाळी बेंगलोर येथे हरे रामा हरे कृष्णा मंदिर दर्शन घेऊन व चालत्या बसमधुन शहर पाहुन रात्रप्रवासाने तिरुपतीसाठी रवाना. |
| 10 | | सकाळी तिरुपती येथे स्वत: दर्शनाचे ऑनलाईन तिकीट घेऊन तिरुमाला येथे श्री व्यंकटेश तिरुपती बालाजी मंदिर दर्शन घेऊन, पद्मावती मंदिर दर्शन घेऊन या यात्रेची सांगता होवुन उपलब्ध रेल्वेने उपलब्ध स्टेशनवरुन प्रस्थान कार्यालयासाठी रवाना. |

टिप : तिरुपती येथील दर्शनाचे ऑनलाईन बुकींग अगोदरच करणे गरजेचे आहे. ऑनलाइन टिकिट न मिळाल्यास फ्रि लाईन मधुन दर्शन घ्यावे लागेल.

### –यात्रा क्र. 31 साठी नियम/अटी/सूचना–

1) सदरहू यात्रेत माहीतीपत्रकातील पहिल्या दर्शनिय स्थळापर्यंतचा व शेवटच्या दर्शनीय स्थळापासुन आपल्या प्रस्थान कार्यालयापर्यंतचा प्रवास हा स्थानिक टॅक्सी/जीप/सुमो/रिक्षा/रेल्वे/एस.टी. वा लोकल नॉन एसी वाहनानेच असतो. (हॉटेल चेकइन टाईम 12:00 वा. असल्यामुळे सकाळी लवकर पोहोचल्यास फ्रेशहोण्यासाठी बाथरूमची व्यवस्था सामुहिक/कॉमन असते.
2) रेल्वे रिझर्वेशन निघण्याची तारीख 1/2 दिवस मागे/पुढे होऊ शकते. निवासस्थान/प्रस्थान कार्यालयापासुन रेल्वे स्टेशनपर्यंत जाणे–येणेची प्रवास व्यवस्था कोणत्याही नॉन एसी वाहनानेच राहते. रेल्वे प्रवासात प्लॅटफॉर्मवरील सामान हमाली/कुली खर्च यात्रेकरुंनाच करावा लागतो.
3) श्रीशैल्यमपर्यंत बॉर्डर पासुनचा प्रवास लोकल (टॅक्सी/जीप/सुमो/रिक्षा/एस.टी.) वाहनाने असतो.
4) सदरहू यात्रेत रामोजी फिल्मसिटीचा तिकीट खर्च कंपनीतर्फेच असतो. उटी/रामेश्वरम/कन्याकुमारी येथे बोटींगचा तसेच इतर सर्वत्र दर्शनिय स्थळांचा प्रवेश फी खर्च यात्रेकरुंनाच करावा लागेल.
5) बुकींग ऑफीसच्या जवळच्या रेल्वे स्टेशनहुन रिझर्वेशन न झाल्यास प्रस्थान तारखेच्या 1 दिवस अगोदर रात्रीच्या प्रवासाने नाशिकसाठी रवाना. ✻✻ केलेल्या स्थळांचा प्रवास हा कमी सिट असल्यास रेल्वे/डेली बस/एसटी बस/लोकल शेअरिंग वाहनाने राहु शकतो.

**विशेष सूचना:**✻मुक्कामाच्या ठिकाणी लॉज/हॉटेलमध्ये रूम इन टाईम दु.12 वा. असतो. मुक्कामाच्या ठिकाणी लवकर पोहोचल्यास सकाळी फ्रेश होण्यासाठी कॉमन व्यवस्था असते. ✻ कंपनीच्या नविनतम माहितीपत्रकात दर्शनिय स्थळे व एकूण दिवस कमी झाल्यास वरील दैनिक कार्यक्रमातून ती स्थळे वगळूनच वाचावी. ✻ दैनिक कार्यक्रमातील ठरलेल्या दिवशीची दर्शनीय स्थळे अगोदर किंवा नंतर दाखविण्याचा अर्थात त्यात मागे–पुढे बदल करण्याचा अधिकार यात्रा आयोजकास व व्यवस्थापक व ड्रायव्हर कम मॅनेजर असून यात्रेकरुंवर तो बंधनकारक राहील. कंपनीचे नविन माहितीपत्रक, एसआरए इ. मध्ये प्रसिध्द केलेले सर्व नियम, अटी, लेखी व तोंडी केलेल्या सुचना यात्रेकरुंवर बंधनकारक राहील. प्रतिसीट भाड्यात यात्रा कालावधीमध्ये दररोज सकाळी चहा, पोटभर नाश्ता व रात्री शुद्ध शाकाहारी जेवण समाविष्ट आहे. मात्र रेल्वे प्रवासात जेवणाचा खर्च यात्रेकरुंना स्वत: करावा लागेल. ✻ यात्रा प्रस्थान होण्याच्या दिवशी नाशिक येथे जेवणाची सुविधा कंपनीतर्फे नसते.